# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

<u>दिनांक २४/०७/२०२४ (बुधवार)</u>

---

## नागपूर ग्रामीण हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

दिनांक २३/०७/२०२४ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध धंदेवाईकावर धाडसत्र मोहीम राबविण्यात आली. पोलीस स्टेशन बुट्टीबोरी, नरखेड, काटोल, जलालखेडा अंतर्गत लोकांकडुन पैसे घेवुन वरली मटक्याचे सट्टीपट्टीचे आकडे लिहुन जुगार खेळ खेळविणारे एकुण ०६ इसमांवर कारवाई करण्यात आली. त्यांचे ताब्यातून सट्टापट्टीचे साहित्य व नगदी ३,८९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोस्टे बुट्टीबोरी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम हा अवैधरीत्या सट्टापट्टी वर लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन जुगाराचा खेळ खेळवत आहे. अशी माहिती मिळाल्याने बाजार चौक मटन मार्केटचे मागे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— विरेंद्र देवचंदजी भंडारी वय ३८ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ रूईखैरी ता. जि. नागपुर** हा सट्टापट्टीचे आकडे लिहताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यातून १) पिवळया रंगाची कागदी चिठ्ठीवर आकडे लीहलेला कागद २) एक डॉट पेन निळया शाईचा ३) नगदी ११००/— रू एकुण ११००/—रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे बोरी कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे नरखेड येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, चोरखेरी येथे मोरेश्वर पावनकर नावाचा इसम हा अवैधरीत्या लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचा जुगार खेळत आहे. अशी माहिती मिळाल्याने चोरखेरी गावात जावुन रेड कारवाई करून **आरोपी नामे— मोरेश्वर बापुजी पावनकर वय ४७ वर्ष रा. वडचिचोली ता पांढुर्णा जि. छिंदवाडा** हा लोकांकडुन पैसे घेवुन सट्टीपट्टीचे आकडे लिहुन हारजीतचा जुगार खेळताना मिळुन आल्याने आरोपीची झडती घेतली असता त्याचे ताब्यातून एक निळया रंगाचा पेन किंमती ५ रू व सटटापटटी लिहलेला कागद व नगदी ३२५ रू असा एकुण ३३० रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे नरखेड कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच **आरोपी भोजराज कावडकर** नावाचा इसम हा बस स्टॉप नरखेड परीसरात अंडयाच्या दुकानाजवळ सार्वजनिक ठिकाणी लोकांकडुन पैसे घेवुन सट्टीपट्टीचे आकडे लिहुन हारजितचा जुगार खेळवत आहे. अशी माहिती मिळाल्याने बस स्टॉप परीसर नरखेड येथे रेड कारवाई करून आरोपीचे ताब्यातून एक निळया रंगाचा पेन किंमती ५ रू व सट्टापटटी लिहलेला कागद व नगदी ८३० रू असा एकुण ८३५ रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे नरखेड कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोस्टे काटोल अंतर्गत ढवळापुर येथे **आरोपी संजय लहानु मडके वय ४८ रा. ढवळापुर ता काटोल** हा लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन हारजीतचा जुगार खेळताना मिळुन आल्याने आरोपीकडुन सट्टापटटी लिहलेला कागद व ०१ पेन किंमती ०५/— रू व व नगदी ३५०/— रू  असा एकुन ३५५ रू. चा मुद्देमाल व काटोल अंतर्गत पेठबुधवार येथे **आरोपी चेतन शंकरप्रसाद तिवारी वय ४२ वर्ष, रा. पेठबुधवार ता. काटोल** हा लोकांकडुन पैसे घेवुन सट्टीपट्टीचे आकडे लिहुन हारजीतचा जुगार खेळताना मिळुन आल्याने आरोपीकडुन सट्टापटटी लिहलेला कागद

व ०१ पेन व नगदी ९७०/— रू असा एकुण ९७०/— रू. चा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला. पोस्टे जलालखेडा अंतर्गत **आरोपी नामे— गजानन वासुदेव काटोलकर वय ३४ वर्ष, रा. जलालखेडा ता. नरखेड** हा लोकांकडुन पैसे घेवुन सट्‌टापट्‌टीचे आकडे लिहुन हारजीतचा जुगार खेळताना मिळुन आल्याने आरोपीकडुन १) नगदी ३००/—रू. २) एक निळया शाहीचा पेन व वरळी मटक्याचे आकडे लिहीलेला कागद असा एकुण ३०० रुपयाचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला.

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक मोहीम

पोस्टे बेला अंतर्गत मौजा चनोडा येथे पोलीस स्टाफ यांना पेट्रोलींग दरम्यान मिळालेल्या गोपनीय खबरेवरून रेड कारवाई केली असता **आरोपी प्रल्हाद सोमाजी दुधे वय ४० वर्षे रा. चनोडा ता. उमरेड जि. नागपुर** याचे घराची दारूबाबत घरझडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातून देशी दारु प्रत्येकी १८० ml च्या १० निपा एकुण १८०० Ml किंमती ७० रु प्रमाणे एकुण ७०० रु चा मुद्‌देमाल एकुण १८०० एम. एल. चा मुद्‌देमाल विनापरवाना अवैद्यरीत्या मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध पोस्टे बेला येथे ६५ मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोस्टे काटोल अंतर्गत मौजा येनवा येथे पोलीस स्टाफ यांना पेट्रोलींग दरम्यान मिळालेल्या गोपनीय खबरेवरून रेड कारवाई केली असता महिला आरोपी हिचे घराची व आजूबाजूचे परीसराची झडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून देशी दारूच्या ७ निपा प्रत्येकी १८० एम एल च्या एकून १२६० एम एल एकुण किंमती ४९०/— रू. चा मुद्‌देमाल विनापरवाना अवैद्यरीत्या मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध पोस्टे काटोल येथे ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली. तसेच काटोल येथील मौजा खैरी नवघरे शिवार येथे **आरोपी तिरूपती बालुराज राउलवार वय ५५ वर्ष रा. झिल्पा ता. काटोल** हा आपले पानठेल्याचे टपरीवर अवैधरीत्या विनापरवाना दारूची विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून झडती घेतली असता आरोपीचे ताब्यातून देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ च्या ०४ निपा प्रत्येकी ७० रूपये प्रमाणे तसेच १८० मिली प्रमाणे एकुण ७२० मिली एकुण किंमती २८० रूपयाचा मुद्‌देमाल मिळुन आला.

पोस्टे खापरखेडा अंतर्गत मौजा वलनी वस्ती येथे **आरोपी मारोती गोपाल चवरे, राहणार वार्ड क्रमांक ०१ वलनी वस्ती** हा आपले घराचे बाजूला अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारू विक्री करीत असताना मिळुन आल्याने पोलीसांना पाहुन घटनास्थळाहुन पळुन गेला. घटनास्थळावर एका काळया रंगाच्या प्लास्टीक डबकीमध्ये अंदाजे २० लिटर तसेच ०२ लिटर हिरव्या रंगाच्या दोन प्लास्टीक बॉटल मध्ये ४ ली. मोहाफुल गावठी दारु असा एकुण २४ लिटरचा मुद्‌देमाल किंमती १२०० रुपयाचा मुद्‌देमाल नाश करण्यात आला. तसेच गुमथी शिवार स्मशानघाट जवळ **आरोपी पुरषोत्तम तुळशीराम शेवारे वय ६५ वर्ष रा. वार्ड कं ०२ गुमथी** हा अवैधरीत्या विनापरवाना देशी दारू बाळगताना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून देशी दारू भिंगरी संत्रा नं १ च्या प्रत्येकी ९० एम एल ने भरलेल्या प्रत्येकी ३५/—रू १३ निपा किंमती ४५५ रू चा मुद्‌देमाल मिळुन आला.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर